Reliance
Industries Limited
Growth is Life

नोंदणीकृत कार्यालय: ३रा मजला, मेकर चेम्बर्स ४, २२२, नरिमन पॉइंट, मुंबई – ४०० ०२१.
दूरध्वनी: +९१-२२-२२७८ ५००० • फॅक्स: +९१-२२-२२७८ ५१११ • ई-मेल: investor_relations@ril.com
CIN: L17110MH1973PLC019786

# सूचना

ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की कंपनीच्या सदस्यांची बेचाळिसावी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवार दिनांक १ सप्टेंबर २०१६ रोजी सकाळी ११ वाजता बिरला मातुश्री सभागार, १९, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग, बॉम्बे हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेन्टर जवळ, न्यू मरिन लाईन्स, मुंबई–४०० ०२० (''सभा'') येथे होईल.

सभेमध्ये करण्याच्या सामान्य व विशेष कामाची सभेची सूचना आणि ३१ मार्च २०१६ रोजी संपलेल्या वर्षाचे कंपनीचे लेखापरिक्षित आर्थिक विवरण आणि एकत्रित लेखापरिक्षित आर्थिक विवरण, त्यावरील लेखापरीक्षकांचा आणि संचालकांचा अहवाल, व्यवस्थापनाची चर्चा आणि विश्लेषण, व्यवसायाच्या जबाबदाऱ्यांचा अहवाल आणि कॉर्पोरेट गव्हर्नन्सचा अहवाल ह्यासह कंपनीचा आर्थिक वर्ष २०१५–१६ रोजी संपलेल्या वर्षाचा वार्षिक अहवाल सदस्यांना त्यांच्या नोंदणी केलेल्या पत्यावर पाठविण्यात आला आहे आणि ज्यांनी डिपॉझिटरीज/कंपनीपाशी त्यांचा ई–मेलचा पत्ता नोंदविला आहे अशा सदस्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविण्यात आला आहे.

सदस्यांना ह्याद्वारे कळविण्यात येत आहे की सभेची सूचना आणि वरील दस्तऐवज कंपनीच्या वेबसाईटवर **(www.ril.com)** उपलब्ध आहेत आणि वरील दस्ताऐवजांच्या प्रती कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात सभेच्या तारखेपर्यंत (शनिवार, रविवार आणि सार्वजनिक सुट्या व्यतिरिक्त) सर्व कामकाजाचे दिवशी कामकाजाच्या वेळेत सभेच्या दिवसापर्यंत तपासणीसाठी उपलब्ध असतील.

सभेला हजर राहण्यास आणि मतदान करण्यास पात्र असलेला सदस्य स्वत:ऐवजी सभेला हजर राहण्यास आणि मतदानाच्या वेळी पोलद्वारे मतदान करण्यास प्रॉक्सीची नेमणूक करू शकतो आणि प्रॉक्सी कंपनीचा सदस्य असण्याची गरज नाही. प्रॉक्सीची नेमणूक करणारे दस्तऐवज वैध होण्यासाठी ते कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात सभा सुरू होण्याच्या किमान ४८ तास अगोदर जमा केले पाहिजेत.

संचालक मंडळाचे आदेशाने
सही/–
के. सेथुरामन
ग्रुप कंपनी सेक्रेटरी आणि
चीफ कंम्पलायन्स ऑफीसर

ठिकाण : मुंबई
दिनांक : ८ ऑगस्ट, २०१६